1/0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** मुखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0355  **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/11/2022 06:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार  **Date From (दिनांक पासून):** 20/11/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/11/2022

**Time From (वेळेपासून):** 13:53 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/11/2022  **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/11/2022 06:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 25 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जांब कडुन शिरुर कडे जाणा-या रो

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** खजा मगदुम शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा अहमदपुर ता अहमदपुर जि ला,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा अहमदपुर ता अहमदपुर जि ला,मुखेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सय्यद शकील पि. सय्यद अजिमसाब | | | 1. रा एसटी कॉलनी, पाण्याच्या ट, लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सय्यद इस्माईल पिता सय्यद अजीम | | | 1. रा एसटी कॉलनी, पाण्याच्या ट, लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 60,000/ रु लाचेची रक्कम | 60,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

60,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

पो . स्टे मुखेड जि. नांदेड
दिनांक 20/11/2022

मी खॉजा मगदुम शेख वय 41 वर्ष धंदा. खाजगी इलेक्ट्रीशिअन रा. अहमदपुर ता. अहमदपुर जि. लातुर. समक्ष पोलीस स्टेशन येथे हजर राहुन फिर्याद देतो की,मी दिनांक 19.11.2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे तक्रार दिली की, मी वरील पत्यावर माझे मुलांचे शिक्षणाकरीता राहतो. माझा भाऊ नामे शेख मेहराज उर्फ पप्पु मकदुम हा कंधार येथे राहतो.व तो तहसील कार्यालय कंधार येथे लोकांचे कागदपत्र तयार करणे त्यांचे काम करणे असे खाजगी रायटर म्हणुन काम करतो व तो कंधार येथे राहावयास आहे.
दिनांक 15.11.2022 रोजी माझा भाऊ शेख मेहराज याने मला फोन करुन सागितले की, फोन नंबर 9657002862 या फोनवरुन त्याचा मोबाईल नंबर 9766326644 या लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथील मॅडम यांचा फोन आला होता. त्यानी भावास सांगीतले की तुमच्या विरुध्द आमच्या कार्यालयास तक्रार आली आहे. त्या तक्रारीचे चौकशी करीता कार्यालयात या असे बोलणे झाल्याचे माझ्या भावाने मला सांगीतले. म्हणुन दुपारी दोन वाजता मी भाऊ मेहराज याने सांगीतलेला मोबाईल नंबर 9657002862 यावर फोन करुन मॅडम आपण ऑफीस मध्ये आहात का मी मेहराजचा भाऊ बोलतो असे सांगीतले.तेव्हा त्यांनी मला सांगीतले की, मी आठ वाजे पावेतो ऑफीस मध्ये आहे तुम्ही एकटेच या असे फोनवर सांगीतले व त्यानंतर अर्धा तासाने मोबाईल क्रमांक 9422047444 या मोबाईल नंबर वरुन माझे मोबाईल नंबर 9923951579 या वर एक इसमाचा फोन आला त्याने मला विचारले तुम्ही मॅडमला भेटण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे जाणार आहात. तुम्ही मॅडमला भेटयला जाऊ नका जांब येथे मला भेटायला या असे सांगीतल्याने मी जांब येथे गेलो.जांब येथे रात्री 07/30 वाजता पोहचलो. परंतु जांब येथे त्या इसमास न भेटता मी नांदेड येथे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात गेलो. तेथुन मॅडम यांच्या मोबाईल नंबर फोन केला त्यांनी फोन रिसीव्ह केला परंतु काही बोलल्या नाही दिनांक 16.11.2022 रोजी मी 9422047444 यावर फोन लावला. कॉलर आयडी पी. ए. सैय्यद साहेब मुंबई असे नाव आले त्याचे बरोबर बोलणे झाल्यावर त्यांनी मला उदगीर येथे शिवाजी चौक येथे भेटण्यास बोलविले.मी उदगीर येथे दुपारी 02.00 वाजता पोहचल्यावर त्या इसमास भेटलो. तेव्हा त्याचे नाव सैय्यद असल्याचे मला समजले. त्याच्या बरोबर बोलत असतांना त्याने त्यांच्या मोबाईलच्या व्हॉटसअप वर माझ्या भाऊ नामे मेहराज याच्याविरुध्दचा तक्रारी अर्ज दाखविला व सांगीतले की, सदरचा अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेडच्या मॅडम यांनी त्यांच्या मोबाईलवर पाठविला आहे असे सांगुन कळविले की, तुमचा भाऊ मेहराज याने तहसीलदार व तलाठी कंधार यांच्या सहया घेऊन देण्यासाठी 10,000/-. रुपये ची मागणी केल्याची तक्रार आहे. त्या अर्जावर लाचलुचपत कार्यालयाकडुन काही कारवाई न करण्यासाठी व त्याचा तक्रारदार यांना योग्य रिर्पाट पाठविण्यासाठी मॅडमला एक लाख रुपये दयावे लागेल. असे सांगीतले मी त्यांना एक लाख रुपये देण्याची परिस्थिती नसल्याचे सांगुन तडजोड करुन 70,000/- हजार रुपये देऊ शकतो असे सांगीतल्याने त्याने लागलीच मॅडमला फोन करुन सांगीतले की, तक्रारी अर्जातील इसम समोर हजर आहे, बोलणी झाली आहे.त्याचे विरुध्द तक्रारी अर्जावर काही कारवाई करु नका असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मॅडम यांना सांगीतले त्यानंतर मी घरी आलो. त्यानंतर तो इसम फोन करुन पैश्याची मागणी करीत असल्याने व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत कार्यालय नांदेड येथील मॅडम पैश्याची मागणी करीत असल्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात येथे दिनांक 18/11/2022 रोजी गेलो होतो. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी औरंगाबाद येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात येऊन नमुद तक्रार दिली आहे. श्री सय्यद हे आज रोजी माझ्या मुळ घरी कंधार येथे भेट घेण्यासाठी येणार आहे. तरी माझ्या तक्रारी प्रमाणे पडताळणी करुन श्री सय्यद यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथील मॅडम यांच्याकरीता लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कारवाई करावी मला व्यवस्थित लिहीता येत नसल्याने माझ्या

सांगण्याप्रमाणे तक्रार लिहुन घेऊन मला वाचुन दाखविली ती समजली बरोबर आहे. श्री सय्यद यांच्या बरोबर माझे कोणतेही देवाण.घेवाण,उसणवारी अथवा व्यवहारीक देवाण.घेवाण नाही. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी मी दिलेली तक्रार उपस्थितीत असलेले शासकीय पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर मी व पंचानी सहया केल्या त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली.

दिनांक 19/11/2022 रोजी पोउपअधिक्षक श्री गांगुर्डे यांनी माझ्या तक्रारीची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी कंधार जिल्हा नांदेड येथे तक्रारदार यांच्या मुळ घरी जाण्याचे ठरविले. मी, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य आम्ही सर्वजण लाचलुपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथुन शासकीय वाहनाने कंधार जि.नांदेड येथे रवाना झालो. कंधार जि.नांदेड येथे माझ्या घराजवळ आलीकडे सुरक्षित ठिकाणी आल्यावर मी वाहन थांबविण्याकरीता पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांना सांगीतले त्यानंतर सदर ठिकाणी माझे भाऊ मेहराज आमच्या जवळ आले तेव्हा मी त्यांची ओळख सापळा पथकातील सर्व सदस्य, अधिकारी व पंचांना करुन दिली. सदर ठिकाणी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी मला माझ्या भावास तसेच पंचास व पडताळणी पथकास आवश्यक सुचना दिल्या.

त्यानंतर श्री सय्यद हे माझ्या राहत्या घरी आमची भेट घेण्यासाठी येणार असल्याने पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे साहेबांनी मला, माझे भाऊ मेहराज व पंच क्रमांक 1) श्री अविनाश शुकला असे आमच्या राहत्या घरी यांची भेट घेण्यासाठी रवाना होण्यापुर्वी त्यांचे सुचनेप्रमाणे श्री वाघ यांनी मला व्हाईसरेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी भाऊ श्री मेहराज व पंच श्री शुकला असे श्री.सय्यद यांची भेट घेण्यासाठी आमच्या घरात जाण्यासाठी पायी पायी रवाना झालो.

त्यानंतर मी, भाऊ मेहराज व पंच श्री शुकला असे माझ्या राहत्या घरी गेलो असता काही वेळाने श्री सय्यद हे आमच्या घरी आले. त्यानंतर माझ्या भाऊ मेहराज यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथे आलेल्या तक्रारीबाबत चर्चा झाली. त्यानंतर श्री सय्यद मला म्हणले की, मी तुम्हाला मदत करतो असे म्हणुन पंचासमक्ष मोबाईल 70000 आकडा टाईप करुन दाखविला त्यावर मी म्हणलो की, 60 हजार रुपये आता देतो, त्यावर सय्यद म्हणले की ह.. त्यावर मी म्हणलो की, 10 हजार रुपये दोन चार दिवसात करुन देतो, त्यावर सय्यद म्हणले की दोन दिवसात दे, जबान दे, असे म्हणुन लाचेची मागणी केली, त्यानंतर मी सापळा कारवाईचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर सापळा पथकातील श्री वाघ यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर श्री गांगुर्डे साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉडींग झालेले संभाषण ऐकले परंतु तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणी काही मुद्दे अधिक स्पष्टता घेण्यासाठी मला थोडक्यात सुचना देऊन पुन्हा माझ्या जवळ श्री वाघ यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व माझ्या सोबत पंच श्री शुक्ला यांना माझ्या राहत्या घरी पाठविले त्यावेळी श्री सय्यद हे माझ्या घरातच माझी वाट पाहत थाबुन बसलेले होते.

त्यानंतर आम्ही सर्वजण मेहराज याच्या विरुध्द असलेल्या तक्रारी बाबत चर्चा केली त्यावेळी सय्यद म्हणले की, तुम्ही उद्या सकाळी मला फोन करुन भेटण्यासाठी या असे म्हणुन सय्यद हे घरातुन निघुन गेले. त्यानंतर मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर सापळा पथकातील श्री वाघ यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर श्री गांगुर्डे साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉडींग झालेले संभाषण ऐकले.

त्यानंतर आम्ही सर्वजन सुरक्षित ठिकाणी असतांना पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे व पंच यांनी व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉडींग ऐकली . त्यामध्ये श्री सैय्यद यांनी 70,000/-. रुपये लाचेची मागणी करुन स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक 20/11/2022 रोजी लाचेची 60,000 हजार रक्कम देण्याचे ठरले. माझ्याकडे असलेल्या जमा रक्कमेतुन 60,000 हजार रुपये उपलब्ध करुन घेतले. सदर उपलब्ध करुन घेतलेली रक्कम ही पंचासमक्ष व श्री गांगुर्डे साहेब यांनी मान्य करुन श्रीसय्यद यांना 60,000 हजार रुपये लाच म्हणुन रक्कम देण्याची ठरविले. दिनांक 20/11/2022 रोजी श्री सय्यद यांना फोन करुन त्यांनी सांगीतलेल्या ठिकाणी सापळा कारवाई कामी पाठविण्याचा सर्वनुमते निर्णय झाला.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी सापळा पथक व पंचाना सापळा कारवाईबाबत थोडक्यात माहीती दिली व श्री.सय्यद यांनी किंवा त्यांनी सांगीतलेल्या इसमाने लाच स्वीकरल्या नंतरचा नियोजीत ईशारा करण्यांस सांगीतले. अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगुन त्यांचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले व मी आणलेली लाचेची रक्कम60,000/-. रुपयेच्या भारतीय चलनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन लाचेची रक्कम श्री.सय्यद यांना देण्याकरीता माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी, माझा भाऊ नदीम व पंच क्रमांक 1 असे माझे चारचाकी वाहनाने व पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे, व पंच क्रमांक 2, पथकातील अधिकारी व अंमलदार शासकीय वाहनाने जांब येथुन शिरुर कडे जाणा-या HP पेट्रोलपंपच्या जवळील परिसरात रवाना होवुन सुरक्षीत ठिकाणी पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी त्यांचे शासकीय वाहन थांबवीले. त्या पाठोपाठ

आम्ही त्यांच्या मागे आलो. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांच्या सुचनेवरुन पोना/वाघ यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मी भाऊ नदीम व पंच श्री.शुक्ला यांचे सह सुरक्षित ठिकाणाहुन माझ्या चारचाकी वाहनाने रवाना झालो व त्या पाठोपाठ मागुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी कोणासही संशय येणार नाही अशारितीने येवुन पेट्रोलपंपच्या आजुबाजुला सापळा लावुन थांबले.त्यानंतर मी श्री सय्यद यांना भेटलो असता तेव्हा आमच्या मेहराज यांच्या कामासंबंधाने चर्चा झाली त्यानंतर श्री सय्यद हे त्याच्या भाऊ इस्माईल यांच्याकडे बघुन त्याच्याकडे पैसे देण्याबाबत सांगुन इस्माईल यांना म्हणला की, इस्माईल ले ले त्यावर मी म्हणलो की, गीन के ले लो.. साठ हजार रुपये है..दस हजार रुपये अस्पष्ट आवाज ..एक बार हाथ मारलो ना.. हम भी दुसरे के पास से ले के आये हुये है.. असे म्हणुन श्री सय्यद यांच्या सोबत असलेला त्यांचा भाऊ श्री इस्माईल यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पुर्वनियोजीत इशारा केला त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी, पंच क्र 2 असे सदर घटनास्थळी आले.

त्यानंतर सापळा पथकाने श्री सय्यद शकील व त्यांचे भाऊ नामे श्री सय्यद इस्माईल यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांचे सुचनेवरुन पंच क्रमांक 2 यांनी आरोपी खाजगी इसम श्री. सैय्यद इस्माईल यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या समोरील खिशातुन ठेवलेली लाचेची रक्कम 60,000/-. रुपये हस्तगत केली. त्यानंतर श्री.सैय्यद शकील व त्यांचे भाऊ श्री सय्यद इस्माईल यांना पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे यांनी स्वतःचा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता श्री सय्यद शकील यांनी त्याचे नाव सय्यद शकील पिता सय्यद अजीमसाब वय 38 वर्ष धंदा. कपडयाचा व्यापारी, रा. एसटी कॉलनी, पाण्याच्या टॉकीजवळ, ता.उदगीर, जि.लातुर असे सांगीतले. त्यानंतर श्री गांगुर्डे साहेबांनी सय्यद इस्माईल यांना नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे सय्यद इस्माईल पिता सय्यद अजीमसाब वय 28 वर्ष धंदा. शिक्षण रा. एसटी कॉलनी, पाण्याच्या टॉकीजवळ, ता. उदगीर जि. लातुर असे सांगीतले.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री गांगुर्डे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VILAS VISHVAMBHAR GOBADE(I (Inspector)) / 15401000362VVGM7701K **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी...

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फा...

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदा...
पो.स्टे.मुखेड जि.नांदेड

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): VILAS VISHVAMBHAI

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): 15401000362VVGM770